-7 JAN 2018

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आविष्कार संशोधन महोत्सव नवनिर्मितीची प्रयोगशाळा

## डॉ. डी. टी. शिर्के : आविष्कार संशोधन महोत्सवाचे पुरस्कार वितरण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आविष्कार संशोधन महोत्सव नवनिर्मितीची प्रयोगशाळा असून विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला व्यासपीठ देण्याचे काम या माध्यमातून होते, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठात विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवाच्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विज्ञानासह सर्वच विषयांत उत्तम संशोधन करता येते, याची प्रचिती आविष्कार संशोधन महोत्सवामधून आली. विद्यार्थ्यांनी आता राहुरी येथील राज्यस्तरीय संशोधन स्पर्धेपुरता विचार न करता गुजरात येथे होणाऱ्या राष्ट्रीय संशोधन महोत्सवासाठीही प्रयत्नांची पराकाष्ठा करावी, असे आवाहन त्यांनी केले. विद्यापीठाच्या लोककला केंद्रामध्ये आविष्कार महोत्सवाचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आविष्कार संशोधन महोत्सवात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध संशोधनाची माहिती घेताना डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, महेश काकडे, अजित चौगुले, डॉ. भारती पाटील आदी.**

मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, अधिष्ठाता डॉ.भारती पाटील, महोत्सवाचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे समन्वयक डॉ. पी. एस. पाटील, डॉ. डी. टी. डोंगळे आदी उपस्थित होते. महोत्सवात कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हानिहाय तसेच विद्यापीठांतर्गत झालेल्या आविष्कार महोत्सवातील प्रत्येक गटामधून निवडलेल्या तीन विजेत्यांना त्यांचे संशोधन प्रदर्शित करण्याची संधी देण्यात आली.

**स्पर्धेचा निकाल गटनिहाय असा :** मानव्यशास्त्र, भाषा, ललित कला, शिक्षण शास्त्र- दामिनी मधुकर साळुंखे (कन्या महाविद्यालय, मिरज), वाणिज्य, व्यवस्थापन, विधी- प्रियांका मदनलाल पुरोहित (विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर), पदार्थ विज्ञान- शौफिक बाळू मुल्लाणी (न्यू कॉलेज, कोल्हापूर), शेती आणि पशुसंवर्धन- सोहनकुमार कलागिरी (राजाराम बापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, इस्लामपूर), अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान- यश विजय आंबले (न्यू कॉलेज, कोल्हापूर), वैद्यकीय आणि फार्मसी- संभाजी राघाप्पा मासाल (भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, कोल्हापूर).

**राज्यस्तरीय महोत्सवात सहभाग**

प्रत्येक गटातील एका विजेत्याला राज्यस्तरीय आविष्कार महोत्सवामध्ये सहभागी होता येणार आहे. राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठात दि.१५ ते १७ जानेवारी दरम्यान राज्यस्तरीय महोत्सव होणार आहे.

### वाहनांच्या वेगावर वीज, खजूरचे शुगर फ्री चॉकलेट..

महोत्सवात विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रदर्शन तसेच विविध प्रकल्पांच्या प्रतिकृती सादर केल्या. न्यू कॉलेजमधील यश आंबोळे याने महामार्गावरील वाहनांच्या वेगावर वीज निर्मितीचे संशोधन सादर केले. काळे खजूर वापरून शुगर फ्री चॉकलेट, सायबर इन्स्टिट्यूटमधील नम्रता विभुते हिने कलिंगडच्या बियांपासून केक, उसाच्या चिपाडापासून होणारे फायदे, जास्वंदाच्या फुलांपासून आयुर्वेदिक औषध निर्मिती, डाळिंबाच्या सालीपासून वस्त्रोद्योगासाठी लागणारा रंग, कऱ्हाडच्या एसजेएम कॉलेजच्या रुचिता चव्हाण हिने पाण्यामध्ये मिसळलेले तेल वेगळे करणे, तसेच ऋतुजा थोरात हिने रद्दीपासून इथेनॉल निर्मितीचे संशोधन सादर केले. मिरजेच्या कन्या महाविद्यालयातील विद्यार्थिनीने वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांवर संशोधन करून एका महत्त्वाच्या सामाजिक विषयावर प्रकाशझोत टाकला. अशा विविध गटांमधून निवडलेल्या विद्यार्थ्यांना दि. ९ ते ११ जानेवारी या कालावधीमध्ये विद्यापीठामध्ये मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 JAN 2018
महाराष्ट्र टाईम्स

# घरातच व्हावे कचरा वर्गीकरण



**प्रा. आसावरी जाधव**
पर्यावरण विभाग,
शिवाजी विद्यापीठ.

१९९९ पासून २००६ पर्यंत प्लास्टिक कचऱ्यासंबधात पाचव्यांदा कायदे व नियम झाले आहेत. पण त्याची प्रभावी अंमलबजावणी प्रशासनाकडून केली जात नाही. प्लास्टिक कचरा रोखण्यासाठी सर्वप्रथम घराघरातून ओला व सुका कचरा वेगळा करण्याची प्रक्रिया सुरू केली पाहिजे. त्यासाठी महानगरपालिकेने नियोजनबद्धपणे आणि प्रसंगी कठोर झाले पाहिजे. जो नियम तोडेल त्याला दंडात्मक शिक्षा केली पाहिजे. शिक्षा झाली की लोकांनाही जाणीव होईल. एकदा नागरिकांना जाणीव झाली की पुढच्या सर्व प्रक्रियांना शिस्त लागेल. रस्ते तयार करण्यासाठी प्लास्टिकचा वापर करण्यांबाबत संशोधन झाले पाहिजे. कारण रस्त्यात प्लास्टिक वापरल्यावर पाऊस पडून डांबरात मिसळलेल्या प्लास्टिकमधील घातक रसायने पाण्यात आली तर त्याचा परिणाम जीवसृष्टीवर होईल. पुढील पिढी सशक्त होण्यासाठी प्लास्टिक विघटन ह शास्त्रोक्त पद्धतीने झाले पाहिजे. त्याचे परिणाम निसर्गावर होऊ नये हे पाहिले पाहिजे. प्लास्टिक टाळण्यासाठी घरापासून कार्यालयापर्यंत भर दिला पाहिजे. प्लास्टिकला पर्याय अशा वस्तूंचा वापर वाढवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. कागदी व कापडी पिशव्या वापरण्यासाठी नागरिकांना प्लास्टिक किती घातक आहे याची जाणीव करून देण्यासाठी प्रबोधन हाच पर्याय आहे. प्रबोधन करणाऱ्या संस्थांना प्राधान्य दिले पाहिजे. प्रबोधन व दंडात्मक कारवाई ही प्रक्रिया वेगाने झाली पाहिजे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
लोकमत
7 JAN 2018

# रोप मल्लखांब स्पर्धेसाठी मानसीची निवड




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी येथील विद्यार्थिनी मानसी राजेंद्र नाईक हिची हरियाणा, कुरुक्षेत्र येथे होणाऱ्या आंतर विद्यापीठीय रोप मल्लखांब या स्पर्धेसाठी निवड झाली. तिला स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी या अधिविभागाचे समन्वयक प्रा. डॉ. पी. एस. पाटील, क्रीडा प्रशिक्षक नयीम शेख यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 JAN 2018

महाराष्ट्र टाईम्स

## मानसी नाईक हिची निवड



**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागाची विद्यार्थिनी मानसी राजेंद्र नाईक हिची हरियाणा राज्यातील कुरुक्षेत्र येथे होणाऱ्या आंतर विदयापीठ रोप मल्लखांब या स्पर्धेसाठी निवड झाली. तिला प्रा. डॉ. पी. एस. पाटील, क्रीडा प्रशिक्षक नईम शेख यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

- 7 JAN 2018

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘आविष्कारा’तून उलगडली सृजनशीलता


**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी विद्यापीठ स्तरीय आविष्कार महोत्सव पार पडला. या महोत्सवात तीन जिल्ह्यांच्या विविध महाविद्यालयांतून आलेले ३६ प्रकल्प मांडण्यात आले होते.

शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील तीन जिल्ह्यातून जिल्हास्तरीय आविष्कार प्रकल्पांची स्पर्धा घेण्यात आली होती. त्यामधून प्रत्येक जिल्ह्यातून प्रत्येकी बारा प्रकल्प निवडण्यात आले होते. या निवडण्यात आलेल्या प्रकल्पांची मांडणी शुक्रवारी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत विविध विषयांवर विद्यार्थी, विद्यार्थिनींनी प्रकाश टाकला.

मिरजेच्या कन्या महाविद्यालयाची विद्यार्थिनी दामिनी साळुंखे या विद्यार्थ्यांनी वेश्याव्यवसायासंबंधी मांडण्यात आलेला प्रकल्प भेट देणाऱ्यांचे लक्षा वेधून घेत होता. दामिनी साळुंखे या विद्यार्थिनीने २० ते ४० या वयोगटातील ४० वेश्यांशी बोलून वेश्यांचे जीवन समाधान, भावनिक परिपक्वता आणि स्वआदर या तीन बाबींची मानसशास्त्रीय चाचण्या यामध्ये घेण्यात आल्या. त्याला संख्याशास्त्रीय जोड देण्यात आली. या अभ्यासाची माहिती घेण्यासाठी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी गर्दी केली होती.

याच वेळी सायबर महाविद्यालयाच्या नम्रता विभूते या विद्यार्थिनीने कलिंगडाच्या बियांपासून तयार केलेला चविष्ट आणि पौष्टिक केक सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. कलिंगडाच्या बिया टाकून दिल्या जातात; मात्र या बिया प्रोटीनचा उत्तम स्रोत आहेत. त्यामुळे याचा घरोघरी वापर करता येतो, असे नम्रता विभूते हिने सांगितले. या स्पर्धेतील विजेत्या प्रकल्पांना राज्यस्तरीय स्पर्धेसाठी विद्यापीठातर्फे पाठवण्यात येणार आहे.



कोल्हापूर : आपल्या प्रकल्पाची माहिती देताना सायबर महाविद्यालयाची विद्यार्थिनी नम्रता विभूते. (छाया : एस. अली)